


दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ९ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.
दैनिक वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
** पात्रता **
१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे
संपर्क-९४२२६६००७७
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

# मराठा आरक्षण भरती न्यायालयाच्या अधीन

**वादळवार्ता न्यूज नेटवर्क**

मराठा आरक्षणासाठी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या काही महिन्यांपासून आंदोलन केले होते. त्या आंदोलनानंतर राज्य सरकाराने मराठा समाज मागस असल्याचा अहवालानुसार १० टक्के आरक्षण दिले. या दहा टक्के आरक्षणाच्या विरोधात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर शुक्रवारी सुनावणी झाली. या सुनावणीत कुठलीही भरती ही न्यायालयाच्या आदेशाच्या आधीन राहील, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहे. तसेच या प्रकरणी पुढील सुनावणी येत्या मंगळवारी होणार आहे. जाहिराती मराठा आरक्षणानुसारराज्यात १७ हजार जागांसाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरु केली आहे. तसेच दोन हजार शिक्षकांची भरती केली जाणार आहे. तसेच ५० हजार मेडिकल विद्यार्थ्यांच्या प्रवेश मराठा आरक्षणानुसार होणार होता. त्यामुळे यावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली. त्यावर न्यायालयाने कुठलीही भरती ही न्यायालयाच्या आदेशाच्या आधीन राहील, असे आदेश देत पुढील सुनावणी मंगळवारी १२ मार्च रोजी ठेवली.



## कोर्टाच्या निकालानंतर सदावर्ते म्हणाले...

उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर माध्यमांशी बोलताना गुणरत्न सदावर्ते म्हणाले की, राज्य सरकारला फक्त तारीख पे तारीख हवी होती. त्यामुळे मेडीकल प्रवेश तारखा आम्ही कोर्टाच्या निर्दशनास आणून दिल्या. राजकीय हव्यासापोटी सरकारने हा निर्णय घेतला, हे आम्ही कोर्टाच्या निर्दशनास आणून दिले. तसेच सुप्रीम कोर्टाचे आम्ही दाखले दिले. ते कोर्टाने मान्य केले. सरकार खुल्या प्रवर्गातील गुंणवंतांवर अन्याय करतंय ही आमची भुमिका कोर्टानं मान्य केली. तसेच हा कायदा टिकला नाही तर ? या आम्ही उपस्थित केलेल्या या प्रश्नाचं उत्तर सरकार पक्ष देऊ शकले नाही, असे सदावर्ते यांनी म्हटले.

## विशेष अधिवेशात दहा टक्के आरक्षण

राज्य सरकारने विशेष अधिवेशन घेऊन २० फेब्रुवारी रोजी मराठा समाजास दहा टक्के आरक्षण देणारे विधेयक समंत करुन घेतले. राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल स्वीकारला. मराठा समाजाला नोकऱ्यांमध्ये दहा टक्के आरक्षण आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांसाठी दहा टक्के आरक्षण देण्याचा मसुदा मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने सुरु केली. त्यानंतर पोलीस भरती, शिक्षक भरती आणि वैद्यकीय प्रवेशाला हे आरक्षण लागू केले.

# अनिल तुरुकमारे यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर.

**वादळवार्ता/बीड**

पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांना २०१९-२० चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासनाने समाजकल्याण विभागामार्फत जाहीर केला आहे.

अनिल तुरुकमारे यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या उन्नतीसाठी समाजकार्य केलेले आहे. तसेच यासर्व समाजाच्या विविध मागण्या तसेच अन्याय अत्याचारा विरुद्ध आवाज उठवलेला आहे. सामाजिक क्षेत्रात कार्य करित असलेल्या समाजसेवेची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार २०१९-२० चा जाहीर केला आहे . पुरस्कार मिळाल्या बाबत अनिल तुरुकमारे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रज फडणवीस , उपुख्यमंत्री अजित पवार , महाराष्ट्राचे कृषी मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्रजी कवाडे, महाराष्ट्राचे समाजकल्याण चे मुख्य सचिव सुमन भांगे साहेब, माजी कॅबिनेट मंत्री जयदत क्षिरसागर,



आमदार सुरेश आण्णा धस, आमदार प्रकाश सोळुंके, आमदार लक्ष्मण आण्णा पवार, स्व. विनायकराव मेटे, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार अमरसिंह पंडित, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप भाई कवाडे, भाजपचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना बीड जिल्हाध्यक्ष अनिल दादा जगताप, शिवसेना जिल्हाध्यक्ष सचिन मुळूक , शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंडलिक खांडे यांचे जाहीर आभार मानलेले आहे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री अजित पवार व मान्यवरांच्या हस्ते मुंबई येथे १२ मार्च रोजी पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसमेलन उत्साहात संपन्न



**वादळवार्ता/अंबाजोगाई**

अंबाजोगाई शहरातील गुरुवार पेठ परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ नुकतेच मोठया उत्साहात संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हमीद चौधरी तर उद्घाटक म्हणून शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रतिष्ठानचे सचिव विष्णू सरवदे, रोटरी क्लबचे अध्यक्ष स्वप्निल परदेशी, येथील नामांकित विधीज्ञ ॲड. इस्माईल चौधरी, माजी नगरसेविका सुरय्या भाभी चौधरी, जुम्मा भाई चौधरी, उमेश नाईक इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

सध्या खाजगी शाळांचे स्नेहसंमेलन मोठा गाजावाजा करत तसेच मोठ्या लखलखाटात साजरे केले जात आहेत.जिल्हा परिषदेच्या शाळेतील घटती विद्यार्थ्यांची संख्या व तेथील परिस्थिती लक्षात घेता जिल्हा परिषद शाळांचे वार्षिक स्नेहसंमेलन क्वचितच पहावयास मिळतात. गुरुवार पेठ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व शाळेतील शिक्षक त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपणही कोणत्या खाजगी शाळेच्या कमी नाहीत या भावनेतून आपले वार्षिक स्नेहसंमेलन २०२४ नुकतेच संपन्न केले.

शाळेच्या या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपले कलागुण सदर केले. शाळेतील प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समितीतर्फे "बेस्ट स्टुडन्ट ऑफ द क्लास"म्हणुन सन्मानचिन्हे देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी स्नेह संमेलनाचे उद्घाटक विजय रापतवार व ॲड .इस्माईल चौधरी यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कला गुण सादर केले. हे उत्कृष्ट स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक शेख मुजम्मिल यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख नसीर सर यांनी केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांसह पालकांची देखील उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

# पाटोद्यात महिला संदर्भातील विविध कायद्याबाबतचे मार्गदर्शन शिबिर संपन्न शिबिरास महिलांची मोठी उपस्थिती

**वादळवार्ता/पाटोदा**

महिलांना सन्मानपूर्वक जगता आले पाहिजे तसेच नोकरीच्या ठिकाणी अथवा घरगुती ठिकाणी महिलावर होणाऱ्या हिंसाचारा पासून महिलांनी कसे संरक्षण करावे सोबतच महिला संरक्षण विषयी विविध कायद्यासंदर्भाचे माहिती पाटोदा येथे आयोजित मार्गदर्शन शिबिरात बोलताना पाटोदा न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस एन निकम यांनी दिली जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत पाटोदा न्यायालय विधी सेवा समिती पाटोदा व वकील संघ पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने दि ७ मार्च रोजी रेणुका माता मंदिर पाटोदा येथे महिलाना कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर घेण्यात आलं कार्यक्रमास मा.दिवाणी न्यायाधीश पाटोदा मा.श्रीमती एस.एन.निकम या अध्यक्ष स्थानी होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मैडम उपस्थित होत्या.. ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा करण्यात येतो.महिलांना सन्मानपूर्वक जगता आले पाहिजे तसेच नोकरीच्या ठिकाणी अथवा घरगुती हिंसाचार यापासून संरक्षण मिळावे म्हणून तसेच महिला संरक्षण विषयी विविध कायदे करण्यात आलेले आहेत




या कायद्याची माहिती महिलांना असणे आवश्यक आहे या दृष्टिकोनातून पाटोदा वकील संघ आणि विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रेणुका माता मंदिर पाटोदा येथे कायदेविषयक जनजागरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी बोलताना दिवाणी न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम यांनी महिलांच्या स्वतःच्या संरक्षणात केलेल्या कायद्यासंदर्भात ची तसेच महिला संदर्भाची इतर कायद्या संदर्भात सविस्तर अशी माहिती उपस्थितांना मार्गदर्शन करताना दिली. तसेच सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर पाटोदा मा. श्रीमती ए. ए. पाटील या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या त्यांनी महिलांच्या अल्पवयीन लग्न संदर्भाच्या केलेल्या कायद्या विषयी मार्गदर्शन केले. तसेच विधिज्ञ श्री.एस.एन. घुमरे यांनी महिला कायद्या विषयी माहिती सांगितली. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रस्ताविक विधिज्ञ .एस. बी. थोरवे यांनी केले. या कार्यक्रमात एस.एम. गर्जे मॅडम यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले. सदर कार्यक्रमास मा.श्रीमती एस.एन.निकम मॅडम दिवाणी न्यायाधीश पाटोदा, मा.श्रीमती ए.ए.पाटील, सह दिवाणी न्यायाधीश पाटोदा तसेच पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष .एस.एस.कोठेकर, विधिज्ञ एस.बी.कोकाटे, विधिज्ञ .ए.एस.वैद्य. विधिज्ञ टि.डी. जाधव तसेच वकील संघातील सर्व विधिज्ञ, न्यायालयीन कर्मचारी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# गटार या नाटकाच्या प्रयोगास नागसेन बुद्ध विहार येथे मोठ्या संख्येने उपस्थित रहा - गणेश शिंदे

**वादळवार्ता/बीड**

दिनांक ९ मार्च २०२४ रोजी सायंकाळी (६:३०) वा साड सहा वाजता च्या दरम्यान बीड शहरातील पालन चौक परिसरात असलेल्या नागसेन बुद्ध विहार येथे बहुजन रंगभूमी नागपूर प्रस्तुत गटारीकरणाच्या भीषण रात्रीचा अस्त घडविणारी क्रांतिकारी पहाट ""गटार" या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येत आहे या नाटकाचे लेखक दिग्दर्शक वीरेंद्र गणवीर हे असून उद्घाटन प्रसंगी डॉ. दीपाताई क्षीरसागर




अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा बीडच्या अध्यक्ष च्या राहणार आहे तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी नगरसेविका पूजाताई गणेश वाघमारे या असणार आहेत या कार्यक्रमाचे संयोजन गणेश वाघमारे, डॉ. दुष्यंता रामटेके, गणेश शिंदे,कबीर जाधव,राहुल साळवे व परिसरातील नागरिक यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# स्त्री च्या वेदना जेव्हा पुरुषाला समजतील तेंव्हाच पुरुषांना सहजीवनाचा खरा अर्थ समजतो डॉ. वृशाली किन्हाळकर

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

पती पत्नी म्हणून एकत्र रहात असताना एकमेकांच माणूसपण एकदुस-याला जाणवणं यापेक्षा सुंदर सहजीवन असू शकत नाही स्त्री च्या वेदना जेव्हा पुरुषाला समजतील तेंव्हाच पुरुषांना सहजीवनाचा खरा अर्थ समजेल असे मत प्रख्यात कवयत्री -साहित्यिक तथा स्त्री रोग तज्ञ डॉ. वृशाली किन्हाळकर यांनी येथे व्यक्त केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने गुरुवारी येथील सजग अंबाजोगाईकर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात "सहजीवनातील बदलते भावविश्व" या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख चेतना तिडके व बेल्जियम येथे महिला कार्यक्रमासाठी निवड झालेल्या संजिवनी घुरे या उपस्थित होत्या. "सहजीवनातील बदलते विश्व" या विषयावर विस्तारीत विवेचन करताना डॉ. वृशाली किन्हाळकर पुढे म्हणाल्या की, आजच्या कार्यासाठी संयोजकांनी हा आगळावेगळा विषय ठेवला त्या बद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. सहजीवनातील बदलते भावविश्व समजून घेतांना या विषयाकडे आपल्या काल आज आणि उद्या या तीन पातळीवरील बदलते भावविश्व समजून घ्यावे लागतील. पाण्यामध्ये जेंव्हा आपण मीठ टाकतो तेंव्हा मीठ पाण्यामध्ये सहजपणे विरघळून जाते, मात्र आपला खारटपणा ते सोडत नाही. सहजीवन असेच आहे.

आपले अस्तित्व न सोडता आपल्या जोडीदारासोबत सहजपणे मिसळून जाणे म्हणजेच सहजीवन आहे. सहजीवनाच्या काल आज आणि उद्या च्या प्रवासाकडे आपण डोळस नजरेने पाहीले तर कालचे (पुरातन काळातले) सहजीवन हे महिलांवर लादलेले असायचे. त्याकाळी स्वयंवर व्हायचे.या स्वयंवरात पुरुषाला एखाद्या पण लावण्यात येत असे, तो पण त्याने जिंकला की मग त्या स्त्री शी त्यांचे स्वयंवर व्हायचे. या प्रक्रियेमध्ये काही तरी जिंकून एखादी वस्तू मिळवायची हा भाव असायचा. पण जिंकलेल्या पुरुषा सोबत स्वयंवर नाकारण्याची हिंमत त्या स्त्री मध्ये नसायची.



वास्तविक पाहता पुरुषांसोबत सहजीवन देणारी स्त्री ही खुप सोशीक, निसर्गाने दिलेले शारीरिक त्रास सहन करणारी, अत्याचार सहन करणारी असते. स्त्रीयांच्या बाबतीत "क्षणाची पत्नी अनंत काळची माता" हे वाक्य आपण अनेक शतकांपासून ऐकत आहोत. पण "पुरुष क्षणाचा पती आणि अनंत काळाचा बाप" कधी होणार आहे का नाही? यांचा ही आता विचार करण्याची वेळ आली आहे. सहजीवनात शारिरीक मिलनाचा अतिशय महत्व आहे. या मिलनामुळेच आज पृथ्वी टिकून आहे. निसर्गाने एक खुप मोठी शक्ती स्त्री ला दिली आहे. या मिलनानंतर स्त्री ही अपत्य जन्माला घातले. बाळंतपणाच्या मरण यातना ती सहन करते. कुठून येते तिच्यात ही सगळी शक्ती, याचा तिच्या जोडीदारानेगांभिर्याने विचार करायला पाहिजे. किती पुरुष बाळंतपणानंतर आपल्या बायकोला जवळ घेवून तिला बाळंतपणात किती त्रास झाला हे प्रेमाने विचारतात? मला बाप केलंस, त्याचं ऋण मी कसं फेडू असं आपल्या पत्नीला विचारतात? हा प्रश्न आहे. स्त्री देहाचं कधी तरी ऋण पुरुषाला का माणावस वाटतं नाही हा प्रश्न आहे. स्त्री च्या या वेदना जेव्हा पुरुषाला समजतील तेंव्हाच पुरुषांना सहजीवनाचा खरा अर्थ समजला असे म्हणता येईल असे डॉ.वृशाली किन्हाळकर यांनी सांगितले. या कार्यक्रमात अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख चेतना तिडके यांनी महिला आज सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवत असल्या तरी अजूनही महिलांची अवस्था खुप दयनीय आहे , अजूनही स्त्री बंधनात अडकलेलीच आहे असे सांगून ही परिस्थिती बदलण्यासाठी पुरुषांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली. जेष्ठ नागरिक संघ महिला आणि महेश्वरी महिला संघाच्या सदस्यांनी गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिभा देशमुख यांनी केले तर मान्यवरांचे स्वागत लिनेन्स क्लब आणि इनव्हीलर क्लब च्या सदस्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजुषा महाजन यांनी केले. तर आभार ओमकेश दहिफळे यांनी मानले.

## संपादकीय

### काव्यफुलेच्या कवयित्री: सर्वांची माई सावित्री!

शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणारऽऽऽ.. अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या.. सविस्तर वाचा, सावित्रीमाईंचा लेकरू- श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दशैलीतून... संपादक.

सावित्रीमाई फुले यांचा जन्म दि.३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव खंडोजी नेवासे- पाटील तर आईचे नाव लक्ष्मीबाई होते. सावित्रीमाईंची जयंती महाराष्ट्रात महिला मुक्ती दिन म्हणूनही साजरी केली जाते. सावित्रीमाईंना शिक्षणसम्राट महात्मा जोतिरावजी फुलेंनी शिकवले आणि स्त्री शिक्षणाचा पाया रचला. आज सावित्रींच्या लेकी जगात सर्वत्र सर्व क्षेत्रांत आघाडीवर आहेत. याची सुरुवात सावित्रीमाईंमुळे झालेली आहे. कारण त्यांनी शिक्षणमंत्रच आपल्या काव्यसंग्रह- काव्यफुलेमधून दिला-

"विद्या हे धन आहे रे, श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जयापाशी, ज्ञानी तो मानती जन॥"

म.जोतिरावजी फुलेंचे मूळ आडनाव गोरे होते. पण पेशव्यांनी त्यांचे वडील गोविंदराव फुले यांना पुण्यातल्या फुलबागेची जमीन बक्षीस दिली. म्हणून त्यांचे कुटुंब पुण्यात आले. त्यांच्या फुलांच्या व्यवसायावरून त्यांचे आडनाव फुले असे पडले. जोतिरावांचा सावित्रीमाईंशी विवाह झाला, तेव्हा त्या अवघ्या ९ वर्षाच्या होत्या. शिक्षणसम्राट जोतिरावजी फुले स्वत: शिकले आणि त्यांनी सावित्रीमाईंना शिकवले. दि.१ मे १८४७ रोजी म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी १०० वर्षांआधी सावित्रीमाईंनी पुण्याच्या मागास वस्तीत एक शाळा काढली. ही त्यांची पहिली शाळा आणि दि.१ जानेवारी १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. दलितांच्या व्यथा-वेदना मांडणारी पहिली कवयित्री म्हणून त्यांना अग्रमान द्यायलाच हवा!

"इंग्रजी माऊली देई सत्य ज्ञान। शूद्राला जीवन देई प्रेमे॥
इंग्रजी माऊली शूद्रांना पान्हा पाजी। संगोपन आजी करतसे॥
इंग्रजी माऊली तोडते पशुत्त्व। देई मनुष्यत्त्व शूद्रलोका।।"

ज्ञानज्योती फातिमाबी शेख याही त्यांच्यासोबत शिक्षिका म्हणून कष्ट उपसत होत्या. ही सर्वार्थाने मुलींची पहिली शाळा ठरली. मागास वस्तीतील शाळा काही दिवसात बंद पडली. या शाळेत सावित्रीमाई मुख्याध्यापिका झाल्या. सावित्रीमाईंना कणाकणातून ज्ञान वेचायला शिकवणाऱ्या जोतीबांचा त्यांच्या जीवनपद्धतीवर सर्वात मोठा प्रभाव होता. ते काव्यसुमनातून सांगताना त्यांनी लिहिले-

"काळरात्र गेली। अज्ञान पळाले॥
सर्वे जागे केले। सूर्याने या॥
शूद्र या क्षितिजी। जोतीबा हा सूर्य॥
तेजस्वी अपूर्व। उगवला॥"

सावित्रीमाईंच्या या शाळेत सुरुवातीला फक्त सहा मुली होत्या. वर्षभरात ही संख्या जेमतेम ४५ पर्यंत पोहोचली. शाळा काढून मुलींना शिकवायला सुरुवात केली म्हणून सनातन्यांनी आणि उच्चवर्णीयांनी धर्म बुडाला. जग बुडणारऽऽऽ.. अशी फुले दांपत्यावर टीकेची झोड उठवली. सावित्रीमाईंच्या अंगावर शेण, दगड व विटा फेकले. काही उन्मत्त लोक तर त्यांच्या अंगावर धावून गेले. बहिष्कारही घालण्यात आला. तरीही त्या डगमगडल्या नाहीत. स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे, हे त्यांनी ओळखले. आता त्या अधिक उत्साहाने कामाला लागल्या. सन १८५४ सालीच अस्पृशोद्धारक जोतीरावांना ज्ञानसूर्याची उपमा देऊन सावित्रीमाईंनी त्यांच्या महानतेची प्रचिती दिली-

केवळ मुलींना शिक्षण देऊन भागणार नाही. अपप्रवृत्तीविरुद्ध लढले पाहिजे. बाल-जरठ विवाह प्रथेमध्ये अनेक मुली वयाच्या १२-१३व्या वर्षी विधवा होऊ लागल्या. अशा मुलींना नवऱ्याच्या चितेवर उडी टाकून सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप केले जाई. या सर्व दुष्ट प्रथेला त्यांनी कडाडून विरोध केला आणि शिक्षणसम्राट म.फुलेंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. सावित्रीमाईंनी ते समर्थपणे चालवले. एवढेच नव्हे तर बलात्काराने गरोदर राहिलेल्या महिलांचे बाळंतपण त्या स्वतः करत होत्या. याच ठिकाणी काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल फुले दांपत्यानी दत्तक घेतले आणि त्याचे नाव यशवंत ठेवले. अशा या महान सावित्रीमाईंची काव्य फुले आणि सावित्रीमाईंची भाषणे ही पुस्तके प्रसिद्ध झाली. बहुजनांना अज्ञानाच्या गाढ झोपेतून गदागदा हलवून जागे करताना त्यांनी लिहिले-

-सावित्रीमाईंचा लेकरू-
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**

# ग्राहक राजा जागा हो! वीज मीटर विरोधाचा धागा हो!!

(महावितरणचे स्मार्ट प्रिपेड मीटर विशेष.)

आता विजवितरण कंपनीचे स्मार्ट प्रिपेड मीटर मोबाईलप्रमाणेच रिचार्ज करता येणार आहे. नमुना पडताळा म्हणून सर्वप्रथम शासकीय कार्यालये, वसाहतींमध्ये मीटर लागणार आहेत. महाराष्ट्र राज्यातील महावितरणच्या २.६१ कोटी ग्राहकांकडे स्मार्ट प्रिपेड मीटर लागणार आहे. पहिल्या टप्प्यात हे मीटर सर्व शासकीय कार्यालय आणि शासकीय वसाहतींमध्ये लागणार असून त्यानंतर सर्वसामान्य ग्राहकांकडे लावण्याचे नियोजन आहे. आशा करुया, की विजजोडणीच्या नावाखाली गरीब ग्राहकांची होणारी लूट, वंचना, फसवणूक काही प्रमाणात तरी थांबेल. यावर प्रकाश टाकणारा सदर संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा शब्दांत जरूर वाचा... संपादक.

मोबाईलप्रमाणेच रिचार्ज करता येणारा स्मार्ट प्रिपेड मीटर सर्वप्रथम शासकीय कार्यालये, वसाहतींमध्ये लागणार आहे, अशी बातमी वर्तमानपत्रांत नुकतीच प्रकाशित झाली आणि ग्राहकांत एकच कुजबूज होतांना दिसत आहे. वाचनात आले, की महाराष्ट्र राज्यातील वीज महावितरणच्या २.६१ कोटी ग्राहकांकडे स्मार्ट प्रिपेड मीटर लागणार आहे. पहिल्या टप्प्यात हे मीटर सर्व शासकीय कार्यालय आणि शासकीय वसाहतींमध्ये लागणार असून त्यानंतर सर्वसामान्य ग्राहकांकडे लावण्याचे नियोजन आहे. मार्च २०२४ पासून हे मीटर लावण्याचे नियोजन आहे, हे विशेष.

तत्पुर्वी सांगतले जात आहे, की स्मार्ट मीटरचे फायदे असे असतील- मोबाईल सारखे स्मार्ट मीटर रिचार्ज करता येईल, मीटर पोस्टपेड आणि प्रिपेड स्वरूपात उपलब्ध असेल, महावितरणला मीटर रिडिंगसाठी कर्मचारी पाठविण्याची गरज उरणार नाही, वापरलेल्या विजेची डेटा हिस्ट्री एका क्लिकवर मिळेल, ग्राहकांना वीज वापरावर नियंत्रण ठेवता येईल, वीज वापरानुसारच बिल येईल आणि वीजचोरीस आळा बसेल, प्री-पेडमध्ये जितके पैसे जमा आहेत त्यानुसारच वीज वापरता येईल, वीज बिलातील त्रुटी दूर होऊन तक्रारी कमी होतील, मीटरमध्ये फेरफार झाल्यास त्याची सूचना मुख्यालयाला लगेच मिळेल, रिचार्ज संपल्यास बत्ती गुल होईल, स्मार्ट मीटर महाग राहणार आहे, मध्यरात्री अचानक रिचार्ज संपल्यास उकाड्यात ग्राहकांना त्रास सहन करावा लागेल, रिचार्ज संपन्याबाबत ग्राहकांमध्ये राहणार धास्ती, ग्रामीण भागात शेतकऱ्यांसह अशिक्षितांना रिचार्जची समस्या उद्भवेल, मोबाईल कंपन्यांसारख्ये पोस्टपेडमध्ये जास्त बिल येण्याची शक्यता आहे.

महावितरणने राज्यात २ कोटी २४ लाख ६१ हजार ३४६ स्मार्ट प्रिपेड मीटरचे कंत्राट २६ हजार ९२३ कोटी ४६ लाखांमध्ये एकूण चार खासगी कंपन्यांना दिले आहे, असे कळते. त्यानुसार मे.अदानीकडे भांडूप, कल्याण, कोंकण, बारामती, पुणे झोनमधील १३ हजार ८८८ कोटी ७३ लाख रुपयांचे तर मे.एनसीसीकडे ६ हजार ७९१ कोटी ५५ लाख, मे.मॉन्टेकार्लो कंपनीकडे ३ हजार ६३५ कोटी ५३ लाख रुपयांचे आणि मे.जीनस कंपनीकडे २ हजार ६०७ कोटी ६१ लाख रुपयांचे कंत्राट देण्यात आले आहे. दरम्यान, मीटरबाबत राज्यातील ग्राहकांमध्येही सकारात्मक आणि नकारात्मक चर्चा झडू लागल्या आहेत. परंतु, महावितरणने गैरसमज दूर करण्यासाठी पहिल्या टप्प्यात हे मीटर शासकीय कार्यालये आणि शासकीय वसाहतींमध्ये लावण्याचे निश्चित केलेले दिसत आहे. त्यानंतर हे मीटर सर्वच ग्राहकांकडे लागणार आहेत. दरम्यान, हे मीटर १५ मार्चपासून लावण्याचे महावितरणचे नियोजन होते. ही तारीख जवळ असल्याने मीटर नेमके केव्हापासून लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्मार्ट मीटर म्हणजे काय? तर सध्याच्या विजेच्या मीटरचा अत्याधुनिक प्रकार म्हणजे स्मार्ट मीटर होय, असे साध्या-सोप्या शब्दात सांगता येईल. आपण किती वीज वापरली त्याचे वाचन दर महिन्याला वीज कंपनी करते व त्यानुसार ग्राहकाला विजेची देयके पाठवली जातात. पण स्मार्ट मीटरमध्ये आपण किती वीज वापरली याची माहिती ग्राहकाला आपल्या मोबाइलमध्ये कुठूनही, केव्हाही पाहता येणार आहे. तसेच वीजवापरासाठीचे पैसेही कुठूनही, कधीही भरता येणार आहेत. त्यामुळे ग्राहकाला आपला वीजवापर कमी-जास्त करता येईल. मोबाइलच्या धर्तीवरच ग्राहकांना विजेसाठी रिचार्ज करावे लागणार आहे. विजेचा वापर जसा वाढेल, तसे रिचार्जचे पैसे संपत जातील. किती वीज वापरली व किती पैसे उरले याची माहिती ग्राहकाला केव्हाही मोबाइलवरील ॲपमध्ये बघता येईल. प्रीपेड स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकाने भरलेले पैसे संपले की वीजपुरवठा खंडित होईल. पण ग्राहकांना त्यांच्या मोबाइलवर वीजवापराची आणि किती पैसे उरले याची माहिती आधीच मिळेल आणि नव्याने पैसे भरणे सुलभ होईल. घरबसल्या मोबाइलवरून ऑनलाइन पैसे भरण्याचीही सुविधा आहे. ग्राहकाचे पैसे संपत आल्यावर त्याला वितरण कंपनीकडून मोबाइलवर संदेश पाठविला जाईल.

सौर कृषी वाहिनी योजनेने लेटर ऑफ ऑर्डर जारी केल्याची बातमीही वाचायला मिळाली, की शेतकरी बांधवांना दिवसासुद्धा वीज मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २ साठी उपमुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांनी ९ हजार मेगावॅट प्रकल्पाच्या कामाचे लेटर ऑफ ऑर्डर दिल्याचे कळते. हा शेतकरी बांधवांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय असून यामुळे शेतीसाठी दिवसा वीज मिळणे शक्य होईल. यामुळे मागील अनेक दिवसांपासून धूळ खात पडलेली शेतकऱ्यांची मागणी पूर्णत्वास जात आहे, असे दिसते. दरम्यान रात्रीच्या अंधारात वन्यजीवांचे हल्ले, विंचू काटा, अशा गोष्टींचा शेतकऱ्यांना सामना करावा लागत होता, रात्री झालेल्या बिबट्याच्या हल्ल्यांमुळे अनेक शेतकऱ्यांनी जीव गमावला होता. त्यामुळे रात्री वीज नको, तर दिवसांपासून वीज द्या! ही मागणी ठेवलेली होती. या प्रकल्पामध्ये ४० हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली असून २५ हजार रोजगारांचीही निर्मिती होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तर सदर प्रकल्प १८ महिन्यांत पूर्ण करण्याच्या सूचना निर्गमित झाल्याचे कळते. येणाऱ्या काळात या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना होताना बघता येणार आहे आणि शेतकऱ्यांना दिवसाढवळ्या वीज वापरता येणार आहे, हे विशेष! महाराष्ट्र राज्य सरकारकडून सौरउर्जेवर चालणारे उपकरण- कृषिपंप वाटप करण्याच्या सूचना दिल्या आहेत. जवळपास ८ लाख पंप शेतकऱ्यांना वितरीत केले जातील. त्यांचे लवकरात लवकर वाटप करण्यात यावेत, असेही मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे आदेश जारी झाल्याचे कळते. सन २०१६मध्ये मा.फडणवीस साहेबांनीच ही संकल्पना आणली होती. ती प्रथम राळेगण सिद्धी येथे प्रयोगरुपाने मांडली आणि आता संपूर्ण राज्यभर ती योजना अंमलात आणली जाणार असल्याचेही बोलले जात आहे.

या स्मार्ट प्रिपेड मीटरमुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन ग्राहकांना अचूक देयक मिळेल. पहिल्या टप्प्यात हे मीटर शासकीय कार्यालयांसह शासकीय वसाहतींमध्ये लावण्याचे नियोजन आहे. या मीटरमुळे अवास्तव देयकाबाबतच्या तक्रारी कमी होतील, असे महावितरणचे मुख्य जनसंपर्क अधिकारी भारत पवार हे सांगत आहेत, म्हणे. आपण नियमित बिल भरतो का? या प्रश्नाचे उत्तर जर हो असेल तर चिंता करू नका. कारण बिल नियमित न भरणाऱ्या ग्राहकांना प्राधान्याने स्मार्ट मीटर देण्यात येणार असल्याची माहिती महावितरणच्या सूत्रांकडून मिळाली आहे. महावितरणचे अधिकारी याबाबत स्पष्टपणे बोलत नसले तरी डिसेंबर २०२४ पर्यंत प्रीपेड व पोस्टपेड असणारे असे स्मार्ट मीटर लावण्यात येणार होते. वीज बिलासोबतच आता स्मार्ट मीटरचाही बोझा ग्राहकांवर पडण्याची शक्यता आहे, असे दिसत आहे. राज्यातील वीज वितरण यंत्रणा स्मार्ट करण्यावर भर दिला जात आहे. महावितरणाने तब्बल ३९ हजार ६०२ कोटींच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेत १ कोटी ६६ लाख ग्राहकांसाठी स्मार्ट वीजमीटर लावण्यात येणार आहेत. त्याला राज्य शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे. जिथे वितरण हानी १५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्या शहरात आधी स्मार्ट मीटर लावले जातील. जुने मीटर चांगल्या स्थितीत असताना ते बदलून स्मार्ट मीटर देणार का? याबाबत ग्राहकांमध्ये संभ्रम असून सध्या मीटरच्या तुलनेत स्मार्ट मीटर महाग राहणार आहे. त्याचे पैसे कुणी द्यायचे असा प्रश्न उपस्थित झाला आहे. एवढ्या मोठ्या महागड्या मीटरचा बोजा ग्राहकांवर पडू नये, म्हणून ग्राहक राजाने याला विरोध केला पाहिजे. ते मोफत द्यावे म्हणून लढा उभारायलाच हवा, अन्यथा बहिष्कार घातला जावा, असे वाटते.

केंद्र सरकारची ही योजना असून राज्यात अद्याप स्मार्ट मीटरची खरेदी सुरू झाली नाही. निविदा प्रक्रियेनंतर कोणत्या शहरात किती मीटर लावायचे हे ठरविले जाईल. मात्र, यात सर्व वर्गवारीतील एकूण १ कोटी ६६ लाख ग्राहकांना तसेच ४ लाख ७ हजार वितरण रोहित्र तर २७ हजार ८२६ वीज वाहिन्यांना स्मार्ट मीटर बसविण्याचे योजनेत प्रस्तावित आहे. नागपुर शहरातही लवकरच अंमलबजावणी होईल, असे ऐकले आहे. नागपूर जिल्ह्यात ११ लाख घरगुती ग्राहक आहेत. तर वाणिज्य १ लाख व औद्योगिक २० हजार ग्राहक आहेत. मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर या महानगरांमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात मीटरची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे महावितरणकडून खरेदी होताच पहिल्या टप्प्यात नागपूरमध्ये सुद्धा स्मार्ट मीटर येणार आहे. चला तर मग, अनुभव घेऊन बघुया. हे मीटर ग्राहकांना किती उपयोगाचे आहे, हे वापरल्यानंतरच कळेल, नक्कीच! !! स्मार्ट प्रिपेड मीटर समस्त जनतेला लाभदायक ठरो, हीच रास्त अपेक्षा!!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# मराठा आंदोलकांनी बीडमध्ये भाजप नेत्याचा कार्यक्रम बंद पाडला



वादळवार्ता/बीड

बीड - मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याच्या मनोज जरांगे यांच्याकडून राज्यभराचा दौरा केला असून, दुसरीकडे याच मागणीसाठी मराठा आंदोलक आक्रमक होतांना पाहायला मिळत आहे. दरम्यान, गावात येणाऱ्या राजकीय नेत्यांना मराठा आंदोलक जाब विचारतांना दिसत आहे बीड जिल्ह्यात मराठा आंदोलकांनी भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांचा कार्यक्रम बंद पाडल्याची घटना समोर आली आहे. आरक्षण मिळेपर्यंत गावात एकही राजकीय कार्यक्रम होऊ न देण्याची आंदोलकांची भूमिका आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्याचे भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांचा कार्यक्रम मराठा आंदोलकांनी बंद पाडला असून, जोपर्यंत मराठा आरक्षण मिळत नाही तोपर्यंत गावामध्ये कोणताही राजकीय कार्यक्रम होणार नाही अशी भूमिका मराठा आंदोलकांनी घेतली आहे. माजी आमदार भीमराव धोंडे हे गाव चलो अभियान या कार्यक्रमासाठी निमगाव चोभा या गावात आले होते. यावेळी हा कार्यक्रम सुरू असताना मराठा आंदोलक तिथे पोहचले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत मराठ आंदोलकांनी कार्यक्रम बंद करायला लावला. मराठा आंदोलकांची आक्रमक भूमिका पाहता कार्यक्रम त्वरित बंद करण्यात आला.

# खेळाडूंनी मेहनत घेतल्यास निश्चित यश प्राप्त होते नंदकिशोर मुंदडा

## राजस्थानी प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेचे शानदार उद्घाटन



वादळवार्ता/अंबाजोगाई

खेळाडूंनी आपले खेळाडूपणाचे खेळ दाखविल्या यश निश्चित मिळते व विजय संपादन करू शकता असा विश्वास सामाजिक ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी व्यक्त केले. अंबाजोगाई येथे शुक्रवारी राजस्थानी परिवाराच्या वतीने राजस्थानी प्रीमियम लीग क्रिकेट स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई पीपल्स बँकेचे उपाध्यक्ष प्रकाशचंद सोळंकी होते. तर उद्घाटक म्हणून सामाजिक जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा हे होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी नगरसेवक नंदा महाराज वैष्णव,पिपल्स बँकेचे संचालक पुरुषोत्तम चोपडा, प्रकाश लखेरा, माहेश्वरी समाजाचे जिल्हाध्यक्ष ॲड.ललित तोष्णीवाल, तालुकाध्यक्ष दत्ताप्रसाद लोहिया, आनंद कर्नावट, युवा अध्यक्ष रोहन मुंदडा, संदीप पारिख, शिवप्रसाद शर्मा अमित रांदड, भरत लखेरा, किरण भन्साळी,अभिमन्यू वैष्णव आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, राजस्थानी समाजातर्फे यावर्षी दुसऱ्यांदा क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही चांगली बाब आहे. अशा खेळामुळे राजस्थानी समाज युवा पिढी एकत्र येत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. तसेच विविध खेळामुळे आपले आरोग्य हे व्यवस्थित राहते. खेळाडूंनी आपला खेळ दाखवून विजय कसा संपादित करता येईल यासाठी प्रयत्न करावे, खेळाडूंनी प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते तसेच ह्या क्रिकेट स्पर्धा तालुकास्तरावर मर्यादित न ठेवता जिल्हा,राज्यस्तरीय स्पर्धा आयोजन करावे यासाठी प्रयत्न करावे अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यावेळी नंदा महाराज वैष्णव यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

क्रिकेट लीग स्पर्धेचे उद्घाटन नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजक शुभम लखेरा,अमित रांदड आदित्य लोढा,सुरज बजाज, कमलेश लखेरा, प्रशांत तापडिया, साहिल लखेरा,किरण भन्साळी आदेश कर्नावट, शुभम भन्साळी, सुशील रांदड, प्रशांत तापडिया,अमित भंडारी,योगेश खंडेलवाल, गौरव लोहिया आदी क्रिकेट स्पर्धा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक तापडे यांनी केले. तर उपस्थिती प्रमुख पाहुण्यांचे व खेळाडूंचे आभार अमित रांदड यांनी मानले.या क्रिकेट स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले आहेत.

# महिला आता उद्योजक बनल्या आहेत:केज आ. मुंदडा

वादळवार्ता/केज



महिला आता उद्योजक झाल्या असून त्यांना जास्तीत जास्त मदत कशी उपलब्ध करून देता येईल; यासाठी प्रयत्न करीन. असे आश्वासन आ. नमिता मुंदडा यांनी केज येथे महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या नवतेजस्विनी महोत्सवात उदघाटक म्हणून बोलताना दिले. दि. ७ मार्च रोजी जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने केज येथील मुक्ताई मंगल कार्यालयात महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने नवतेजस्विनी महोत्सव २०२४ चे उदघाटन आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते व केजच्या नगराध्यक्षा सिता बनसोड यांच्या उपस्थितीत मुक्ताई मंगल कार्यालय येथे शुभारंभ झाला यामधे तालुका स्तरीय महिला उद्योजक यांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तू आणि पदार्थांचे प्रदर्शन व विक्री करण्यासाठी आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन तीन दिवस चालणार आहे. यावेळी महिला बालविकास प्रकल्प अधिकारी लटपटे, नाबार्ड चे मारकड, उपस्थित होते. जिल्हा समन्वयक अधिकारी एस. बी. चिंचोलकरयांनी प्रास्तविक केले. बीड जिल्ह्यात महिलाराज आहे. खासदार, आमदार, जिल्हधिकारी,गटविकास अधिकारी, पोलिस उपअधिक्षक या पदावर महिला असल्यामुळे महिलांचे प्रश्न लवकर सुटतीलच आणि आता महिला यशस्वी होण्यासाठी पुरुषाची साथ पाहिजे; परंतु महिला महिलाना साथ देऊन यशस्वी करत आहेत. कर्ज परतफेडसाठी सुध्दा बीड जिल्हा अग्रभागी आहे. बचत गटाना कर्ज वाटपासाठी प्रयत्न करु व नव महिला उद्योजक तयार करु. असे आ नमिता मुंदडा यांनी सांगितले. ज्या वस्तू व खाद्यपदार्थ बाजारात मिळत नाहीत अशा सुंदर वस्तू व खाद्य पदार्थ या बचत गटाच्या महिला तयार करतात आणि ते सर्व प्रदर्शनात मिळतात. याचा आनंद होतो. मी महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करीन. त्या बाबत विधीमंडळात आवाज उठवून महिलाना सहकार्य करण्यासाठी प्रयत्न करीन. असे त्यांनी उपस्थित महिलांना आश्वासन दिले. या महोत्सवात तालुक्यातील महिला उद्योजकांचे विविध उत्पादनाचे प्रदर्शन व विक्री स्टॉल लावले आहेत

# समाजाने महिलांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे-अपर पोलिस अधीक्षक तिडके

## ५८ असंघटित महिला कामगारांचा साडी देऊन सन्मान

दैनिक वादळ वार्ता
अंबाजोगाई/परवेज पटेल


एकीकडे सामाजिक संवेदना बोथट होत जात असताना गोरगरीब, सामान्य लोकांविषयी असलेल्या संवेदना जागृत ठेवण्याचे काम शिक्षण क्षेत्रात खोलेश्वर महाविद्यालय करीत आहे. महिला दिनाच्या - पार्श्वभूमीवर एक अभिनव उपक्रम आयोजित केला होता. अंबाजोगाई शहरातील घरकाम करणाऱ्या ५८ असंघटित महिला कामगार भगिनींचा सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम गुरुवार, दिनांक ७ मार्च रोजी

आयोजित करण्यात आला. होता ज्या महिलांनी आयुष्यभर कष्ट करून कुटुंब उभे केले. त्या महिलांचा यानिमित्ताने सन्मान झाला. घराची धुरा सांभाळताना, कष्ट करीत जबाबदारी घेऊन कुटुंबास आधार व आकार देणा-या माता-भगिनींचा सन्मान करण्याचे खोलेश्वर महाविद्यालयाने ठरविले होते. कामगार महिलांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी या महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून



जागतिक महिला दिन पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या समोर खऱ्या अर्थाने महिला कामगार भगिनींचा सन्मान करून त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी या महाविद्यालयाच्या या उपक्रमाचा उद्देश होता. वंचित, दुर्लक्षित अशा लोकांसाठी खऱ्या अर्थाने संघटना किंवा इतर मंडळींनी पुढे यायला पाहिजे असे वाटते. महिला दिनानिमित्त नारीशक्ती वंदन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या विशाखा समिती आणि अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने स्व.गोपीनाथराव मुंडे सभागृहामध्ये गुरुवार, दिनांक ७ मार्च २०२४ रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके तसेच व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह बिपिनदादा क्षीरसागर, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी व इतर संस्था पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# श्री क्षेत्र अश्वत्थलिंग देवालयात दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी



वादळवार्ता/पाटोदा

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील पंचक्रोशीतील भाविक-भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र अश्वत्थलिंग देवालयातील शिवशंभो महादेव पार्वती दर्शनासाठी दि.८ मार्च शुक्रवार रोजी महाशिवरात्री एकादशी निमित्त सकाळपासून रात्री उशिरापर्यंत भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन दर्शनाचा लाभ घेतला.या ठिकाणी ७ दिवस शिवरात्री महोत्सव प्रित्यर्थ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते.यामध्ये आयोजित केलेल्या किर्तनाला भाविक-भक्त मोठ्या संख्येने येऊन किर्तनाचा लाभ घेतला.तसेच महाशिवरात्रीला येथे मोठा यात्रा उत्सव साजरा केला जातो. महाशिवरात्रीला अश्वत्थलिंग मंदिरात दिवसभर व रात्री १२ वाजेपर्यंत भाविक-भक्त श्री अश्वत्थलिंगास बेलपत्र वाहून श्रद्धेने पूजा करतात.हर हर महादेवाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून जातो.

# बीड जिल्ह्यात प्रथमच मौंजे होळ येथे द्राक्ष महोत्सवाचे आयोजन

## पत्रकार परिषदेत एक्स ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनीची माहिती

वादळवार्ता/अंबाजोगाई

मौजे होळ (ता.केज) येथे दि.८ मार्च शुक्रवार रोजी महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर बीड जिल्ह्यात प्रथमच २०२४ महा द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती एक्स ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या वतीने अंबाजोगाई येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतून देण्यात आली. पत्रकार परिषदेनंतर उपविभागीय कृषी अधिकारी शरद शिनगारे यांच्या हस्ते महा द्राक्ष महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. मराठवाडा विभागातील बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मौजे होळ येथे प्रथमच एक्स ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी, होळचे चेअरमन विवेक शिंदे, संचालक पंजाब शिंदे यांच्या सात एकर शेतीत द्राक्ष लागवडीचा यशस्वी प्रयोग करण्यात आला. त्यांच्याच पुढाकाराने बीड जिल्ह्यात प्रथमच महा द्राक्ष महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून नाशिक येथील अमोल गोऱ्हे, सल्लागार रावसाहेब घाडगे पाटील, शेती तज्ज्ञ नामदेव खाडे हे उपस्थित होते.



उद्घाटन प्रसंगी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषी अधिकारी शिनगारे म्हणाले की, सरासरी कोणत्याही शेतकऱ्याने आजपर्यंत रासायनिक केमिकल मुक्त द्राक्षाचे उत्पादन घेतले जात नव्हते. ते धाडस एक्स ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी, होळ यांनी केले आहे. केमिकल मुक्त द्राक्षाचे अंबाजोगाई, केज शहरात विविध ठिकाणी स्टॉल लावण्यात आले असून ग्राहकांची द्राक्ष घेण्यासाठी गर्दी होताना दिसत आहे. त्याच प्रमाणे यातून स्थानिक तरूणांना शेती उत्पादन, विक्रीचे प्रशिक्षण व रोजगार देखिल मिळत आहे. उदघाटन प्रसंगी होळ पंचक्रोशीतील शेतकरी, स्थानिक नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. तरी शेतकरी ते थेट ग्राहक विक्री व्यवस्था उभी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असेही आवाहन शिनगारे यांनी याप्रसंगी केले.

दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# एम.आय.टी. रोटेगाव मध्ये स्नेहसम्मेलनाचा जल्लोष

**दैनिक वादळवार्ता**
**वैजापूर/चैताली औटे**

वैजापुर तालुक्यातील एम.आय.टी.पॉलिटेक्निक रोटेगाव येथे वार्षिक स्नेह-संमेलन 'क्षितिज-२०२४' नुकतेच मोठ्या उत्साहात साजरे झाले. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून वैजापूर येथील आरोहण अकॅडमिचे अध्यक्ष व डोंगरे मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. राजीव डोंगरे उपस्थित होते. दरम्यान यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना यशासाठी जिद्द, चिकाटी आणि अथक मेहनत करण्याचा सल्ला दिला. कारण यशाला कोणताच शॉर्टकट नसतो असे सांगितले. कोणत्याही कामाची लाज वाटू देऊ नका, अनुभव मिळावा आणि यशस्वी व्हा, असा यशाचा मूलमंत्र असल्याचे सांगितले. आपण ग्रामीण भागातील आहोत, हा न्यूनगंड सोडून द्या. सर्वांना समान संधी उपलब्ध असतात. एकदा मिळालेली संधी पुन्हा मिळत नसते, असेही ते म्हणाले. आपल्या ग्रामीण भागात सर्पदंशाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण जास्त असल्याने त्यावर त्यांनी चिकित्सक अभ्यास केला असल्याचे सांगून अनेकांना यातून वाचविल्याचे समाधान मिळाल्याचेही ते म्हणाले.

याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा परिषद सदस्य श्री.पंकजभाऊ ठोंबरे, रोटेगावचे सरपंच श्री. बळवंत शिंदे, अघुरचे सरपंच श्री.वसंत पाटील मतसागर, पंचायत समिती सदस्य श्री.सुरेश राऊत, रोटेगावचे माजी उप-सरपंच श्री. प्रेमसिंग राजपूत व श्री.काकासाहेब मतसागर तसेच संस्थेचे प्राचार्य प्रा. किशोर पाटील सर, प्रा. एन.आर.सोनावणे, प्रा.डी.पी.आव्हाळे, समन्वयक प्रा.व्ही.जी.तळेकर, सर्व विभाग प्रमुख आणि विद्यार्थी संसदेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यानंतर विद्यार्थ्यांसाठी नृत्य, गायन, द्वंद्वगीत, शेला-पागोटा, अंताक्षरी स्पर्धा, नकला, वन-मिनिट शो तसेच क्रीडा प्रकारात व्हॉलीबॉल, कॅरम, चेस इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर ट्रॅडिशनल-डे, मिसमॅच-डे, टाय-डे, साडी-डे यासारखे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये कु.महिका राजस, कु.पूनम शिहरे, कु.योगिता सोळस, कु.स्वीटी जाधव, कु.प्राची, कु.पल्लवी, सागर चव्हाण, कु.वैष्णवी चव्हाण, रोहित बनकर, सोहम साबळे, कु.जान्हवी कदम, कु.आकांक्षा, कु.पायल पाटील, निलेश भवर, शिवराज शेळके आणि पवन काथार या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.नेहा चव्हाण व कु.सिध्दी बोथे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता विद्यार्थी संसदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. वाय. ए. कवडे सर व महासंचालक प्रा. मुनिषजी शर्मा सर यांनी सर्व विद्यार्थी, सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी यांना शुभेच्छा दिल्या.




# सुंदर शाळा अभियानात तालुक्यातील दोन शाळा प्रथम

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/सालम चाऊस**

जि.प.शाळेत मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा अभियान प्रभावीपणे राबविण्यात आलेल्या शाळेतून जिल्हा परिषद शासकीय गटामध्ये तालुक्यात वरपगावची जि.प.शाळा तर संस्था गटातून घाटनांदूरची सोमेश्वर मा.व उ. मा. विद्यालय या शाळेने प्रथम क्रमांक पटकावल्याची माहिती गट शिक्षणाधीकारी चांदशेख यांनी दिली आहे. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानामध्ये तालुक्यातील सर्वच शाळांनी सहभाग घेतला होता. तालुक्यातील केंद्र मूल्यांकन करून एकूण २२ शाळा मूल्यांकनासाठी निवडण्यात आल्या होत्या. त्यापैकी शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनेनुसार तालुकास्तरीय मूल्यांकन समितीने जिल्हा परिषद शासकीय व्यवस्थापनाच्या क्रमनिहाय तीन शाळा व खाजगी व्यवस्थापनाच्या क्रमनिहाय सूचनेनुसार तालुकास्तरीय मूल्यांकन समितीने जिल्हा परिषद शासकीय व्यवस्थापनाच्या क्रमनिहाय तीन शाळा व खाजगी व्यवस्थापनाच्या क्रमनिहाय तीन शाळांची निवड केली आहे. यामध्ये जिल्हा परिषद गटातून वरपगाव येथील जि.प. ची प्राथमिक शाळा तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर जि.प. शाळा साकुड व्दितीय, जि.प. शाळा सनगाव तृतीय, खाजगी व्यवस्थापनाच्या घाटनांदूर येथील सोमेश्वर मा.व उ. मा. विध्यालय प्रथप, जयप्रभा माध्यमीक विद्यालय कुंबेफळ व्दितीय तर श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळा अंबाजोगाईने तृतीय क्रमांक पटकावल्याची माहिती शिक्षणाधीकारी चांदशेख यांनी दिली आहे. गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने निवड केलेली यादी जिल्हा शिक्षणाधिकारी बीड यांच्याकडे पाठवली आहे. शाळेचे आणि शाळा गुणवत्ता ठरवण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.




ईतर ठिकाणी जमावबंदीचे उल्लंघन होतच नाही का?? - राहुल टेकाळे

जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल मनोज जरांगे पाटील यांच्यासह इतर आंदोलकांवर आयोजकांवर गुन्हे दाखल केले आहेत. प्रशासनाला इतर ठिकाणी झालेल्या जमावबंदीचे उल्लंघन दिसत नाही का? असा संतप्त सवाल राहुल टेकाळे यांनी उपस्थित केला आहे.

## धनंजय मुंडे पोचले मध्यरात्री दवाखान्यात!
## अंबाजोगाईतील स्वाराती रुग्णालयात भगरीतून विषबाधा झालेल्या रुग्णांच्या भेटीला मध्यरात्रीत पोहोचले मुंडे

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई /परवेज पटेल**

मुंबईवरून आपल दिवसभराचे कामकाज आटोपून छत्रपती संभाज नगर मार्गे बीड वरून महाशिवरात्री साठी परळी ला निघालेले राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे अचानक मध्यरात्री अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद ती ग्रामीण रुग्णालयात येऊन पोहोचले. परळी मतदारसंघातील निरपणा या गावाती काही जणांना अन्नातून विषबाधा झाली असून त्यांन अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे दाखल केले असल्याबाबतचे वृत्त समजतात धनंजय मुंडे यांनी आपला परळीच्या दिशेने निघालेला ताफा थेट अंबाजोगाई कडे वळवत,



स्वाराती मध्ये दाखल झालेल्या रुग्णांच्या चौकशीसाठी मध्यरात्री येऊन भेट देत विचारपूस केली राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचा दिवस आज सकाळी नऊच्या सुमारास सुरु झाला होता. दिवसभर विविध शासकीय कामकाज, बीड रेल्वे संदर्भातील बैठक, त्याचबरोबर महा ऍग्रो ॲप चे अनावरण यांसह विविध शासकीय कामकाज आटोपून सायंकाळी धनंजय मुंडे हे महाशिवरात्री असल्याने परळी कडे निघाले होते. मध्यरात्री १२ वाजण्याच्या आधी जाऊन शिवरात्री निमित्त परळी येथील प्रभू वैद्यनाथांचे दर्शन घ्यायचे या हेतूने परळीच्या दिशेने निघाले असता धनंजय मुंडे यांना निरपणा गावातील काही जणांना विष बाधा झाल्याचे वृत्त समजले, त्याबरोबर त्यांनी आपला ताफा अंबाजोगाई कडे वळवत आधी मतदारसंघातील नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे समजले व दर्शन घेणे पुढे ढकलले! दरम्यान धनंजय मुंडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय येथे जाऊन निरपणा गावातील अन्नातून विष बाधा झालेल्या सर्वच रुग्णांची आस्थेवाईकपणे विचारपूस करत त्यांना धीर दिला, तसेच त्यांच्यावर तातडीने योग्य उपचार करण्याच्या सूचना संबंधित डॉक्टरांना दिल्या; तसेच सदर रुग्णांना भगरीतून विषबाधा झाली असल्याने याबाबत योग्य चौकशी करण्याचेही निर्देश धनंजय मुंडे यांनी अन्न भेसळ व सुरक्षा अधिकारी श्री देवरे यांना दूरध्वनीवरून दिले. यावेळी स्वारातीचे डीन व डॉ.धपाटे डॉ.मोगरेकर, डॉ.चव्हाण राजकिशोर मोदी रणजित चाचा लोमटे यांसह आदी उपस्थित होते

# महाशिवरात्री निमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिर नागझरी येथे रामेश्वर महाराज चौरे यांचे कीर्तन

**वादळवार्ता/येवता**

केज तालुक्याती नागझरी येथे वैकुंठवाशी संत चंद्रशेखर बाबा महाराज यांचे वास्तव्य असलेल्या पावन भूमीत विठ्ठल रुक्मिणी मंदिर,नागझरी येथे ह.भ.प.श्री.आप्पा महाराज चौरे चंद्रशेखर बाबा महाराज मठ संस्थान चोंडी ता.धारूर यांच्या संकल्पने आज दि.८रोजी सकाळी ११ते ०२ वेळेत विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर महाशिवरात्री निमित्त ह.भ.प.श्री.रामेश्वर महाराज चौरे,आरणगावकर यांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. महाराजांनी कीर्तनासाठी अभंग शिवभोळा चक्रवर्ती|त्याचे पाय माझे चित्ती॥वाचे वदता शिवनाम तया मोक्ष शिवा देखता प्रत्यक्ष एका जनार्दनी सेवा निवारी ॥जन्म घेते लागे वासनेच्या मरताना आपल्या मुखाला देवाचे नाव येणे याला पण देवाचा अट्टाहास करावा लागतो जन्म मृत्यू कारणीभूत आहे.संत तुकाराम महाराज म्हणत देव म्हणून मी कोणालाही दंडवत करेल पण संत म्हणून नाही,अशा अनेक प्रकारचे दृष्टांत देत महाराजांनी किर्तन सेवा संपन्न झाली कीर्तनास विशेष उपस्थिती म्हणून विश्वनाथ सुखदेव फुंदे व भिकाराम आप्पा सारूक तसेच गायनाचार्य, मृदंगाचार्य,विणेकरी,टाळकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची जास्त प्रमाणात उपस्थिती दिसुन आली.




# आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमीपूजन

**दैनिक वादळ वार्ता**
**गंगापूर/प्रा संजय तुपे**

आमदार सतीश चव्हाण यांनी गंगापूर तालुक्यातील तांदुळवाडी, तळपिंपरी, गवळी धानोरा, नरसापूर, दिघी, कणकोरी येथे विविध विकास कामांसाठी ६५ लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. आज (दि.८) या विकास कामांचे लोकार्पण व भूमीपूजन आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तांदुळवाडी येथे समाज मंदिर परिसराचे सुशोभिकरण करण्यासाठी पाच लक्ष, तसेच गाव अंतर्गत सी सी रोड करण्यासाठी पाच लक्ष, तळपिंपरी येथे गाव अंतर्गत सी सी रोड करण्यासाठी पाच लक्ष, कणकोरी येथे गावअंतर्गत सी सी रोड करण्यासाठी २० लक्ष अस ३५ लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. सदरील कामे पूर्ण झाली असून आज या विकास कामांचे लोकार्पण आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गवळीधानोरा येथे मागील ७५ वर्षांपासून स्मशानभूमी नव्हती. त्यामुळे गावातील नागरिकांना अंत्यविधी करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत होती. आमदार सतीश चव्हाण यांनी पुढाकार घेत जनसुविधा योजनेअंतर्गत सदरील स्मशानभूमी शेड व सुशोभिकरण करण्यासाठी १०लक्ष, नरसापूर व दिघी येथे गावअंतर्गत सी सी रस्ता करण्यासाठी जनसुविधा योजनेअंतर्गत प्रत्येकी १० असा एकूण ३० लक्ष रूपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून या कामाचे भूमीपूजन देखील आमदार सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोलताना आमदार सतीश चव्हाण म्हणाले की, गंगापूर तालुक्यात रस्ते, पाणी, वीजेच्या मोठ्या प्रमाणात समस्या आहेत. शेतकरी, कामगार मुलभूत सोयीसुविधांपासून अजूनही वंचित आहे. मागील दोन वर्षांत राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आपण या तालुक्याच्या विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देऊ शकलो याचे समाधान आहे. तालुक्यात विकासाचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर असून तो भरून काढण्यासाठी माझा नेहमीच पुढाकार असेल असे आमदार सतीश चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्टीचे जिल्हाध्यक्ष मा.आ.कैलास पाटील, तालुकाध्यक्ष अंकुश काळवणे, माजी नगराध्यक्ष संजय जाधव, रमेश निचीत, बादशहा पटेल, रवी माहोरकर, रावसाहेब टेके, शाहिद पटेल, अनुप जैस्वाल, विलास शेंगुळे, आर.आर. मुळे, सिध्देश्वर विधाटे, सतीश मगर, विष्णु मुळे, सरपंच लक्ष्मण मनोहर, शिवाजी चंदेल, महेश खेडकर, इद्रीस पटेल, नईम शहा, नईम शेख, राजकुमार पांडे आदींची उपस्थिती होती.



## असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश

सावखेडा येथील सरपंच सुषमा मुळे, अमोल केदारे, नितेश केदारे, सखाराम बोरूडे, अभिजीत साळवे, रतन खिल्लारे, गोळेगाव येथील ग्रामपंचायत सदस्य कलीम पटेल, माजी सरपंच कय्युम पटेल, हशम शहा, इसाक सय्यद, हशम सय्यद, राजू पटेल आदींसह असंख्य कार्यकर्त्यांनी आज आमदार सतीश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला. यावेळी आमदार सतीश चव्हाण यांनी सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

चौकट - असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )